# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./आयसीसी/२०२३–२४/०२
दिनांक – १७ ऑक्टोबर,२०२३

परिपत्रक

विद्यापीठातील विविध पदव्युत्तर विभागाचे/संस्थाचे विभाग प्रमुख/संचालक यांना अवगत करण्यात येते की, विशेष कक्षाचे क्र.वि.क./आय.सी.सी./२०२२–२३/०३, दि. १३ सप्टेंबर, २०२२ रोजीचे पदव्युत्तर पदवी आणि पी.एचडी. प्रवेश प्रक्रियेबाबतचे परिपत्रक आपणास दिनांक १४ सप्टेंबर, २०२२ रोजी आपल्या विभागाच्या /संस्थेच्या ईमेलवर पाठविण्यात आलेले आहे. (प्रत संलग्न)

याबाबत मा. कुलगुरू महोदयांनी निर्देशित केले होते कि, शैक्षणिक वर्षे २०२०–२१ व २०२१–२२ या वर्षाकरिता विद्यापीठाच्या सर्व विभाग/संस्था मधील पदव्युत्तर पदवी आणि पी.एच.डी. प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांची वर्ष–निहाय, अभ्यासक्रम निहाय, त्यांच्या जातीचा प्रवर्ग व पदवी परीक्षेतील गुणांसह (पात्रता गुण) ई. माहिती विचारण्यात आली होती व ती पुढील बैठकित सादर करण्याबाबत सुचित केले होते. त्याकरिता आपल्या विभाग/संस्थेतील महत्वपुर्ण उल्लेखित माहिती या कक्षास सादर करणे गरजेचे होते. परंतु आजही काही विभाग/संस्थेची विचारण्यात आलेली अत्यावश्यक माहिती या कक्षास अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाही.

तरी सोबत जोडत असलेल्या विवरण पत्रानुसार अत्यावश्यक असलेली इत्यंभूत माहिती ज्या विभाग/संस्थेने आजपर्यंत सादर केली नाही त्यांनी त्वरीत विनाविलंब उपकुलसचिव, विशेष कक्ष, मुंबई विद्यापीठ, खोली क्र. १३३, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ मुख्य कार्यालय, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२. यांचेकडे हार्डकॉपी पाठविण्याची व त्याच्यासोबत त्याची soft copy देखील dr.specialcell@fort.mu.ac.in या ईमेलवर पाठविण्याची व्यवस्था करावी. जेणेकरून सदर बाबत कार्यालयीन कार्यवाही वेळेत करण्यास सुलभ होईल.

[टिप – ज्या विभाग/संस्था यांनी संबंधीत माहिती या कक्षास सादर केली आहे त्यांनी सदरचे परिपत्रक दुर्लक्षित करावे.]

सोबत :– विवरण पत्र (अ व ब)

(डॉ. सुनिल भिरूड)
प्रभारी कुलसचिव

विद्यापीठातील विविध विभागांचे व संस्थाचे विभाग प्रमुख/संचालक यांना कार्यालयीन कार्यवाहीसाठी अग्रेषित.

## विवरण पत्र "अ" (माहिती)

विभागाचे नाव :— शैक्षणिक वर्ष २०२०— २१ व २०२१—२२

| अनु. क्र. | पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेशित विद्यार्थ्याचे नाव | पात्रता टक्केवारी | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(सही)

दिनांक शिक्का विभागप्रमुख / संचालक

---

## विवरण पत्र "ब" (गोषवारा)

विभागाचे नाव :— शैक्षणिक वर्ष २०२०— २१ व २०२१—२२

अभ्यासक्रमाचे नाव :— एकुण विद्यार्थी क्षमता

| प्रवर्ग | अ. जा. | अ. ज. | वि.जा. (अ) | भज. (ब) | भज. (क) | भज. (ड) | विमाप्र | ईमाव | ईडब्लुएस | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

(सही)

दिनांक शिक्का विभागप्रमुख / संचालक